# नियमित दिवाणी दावा क्र.२५८/२०२१ मधील अर्ज नि.क्र.४४ वरील आदेश

**CNRMHSN06001991-2021**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादीच्या अर्जामधील कथन असे की, प्रस्तुतचा दावा हा तुटक वाटप होवुन पृथक कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुतकामी प्रतिवादी क्र.१५ यांना या दावेकामीची समन्स बजावणीसाठी गेले असता, त्यांच्या नावातील फरकामुळे न स्वीकारता परत आलेचे दिसुन येते. वास्तविक प्रतिवादी क्र.१५ यांचे नावा वादी यांच्या माहितीप्रमाणे विठाबाई बाबासाहेब गवळी असेच आहे. तसेच त्यांना प्रथम नाम लक्ष्मी या नावाने देखील संबोधले जाते. त्यामुळे प्रतिवादी क्र.१५ यांचे नावामध्ये विठाबाई उर्फ लक्ष्मी बाबासाहेब गवळी असे नमुद होणे आवश्यक आहे. सदरची चुक ही टंकलेखन दुरुस्तीमुळे झालेली आहे. सदर दुरुस्ती केलेस दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. सबब त्यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दिले असुन योग्य ते आदेश पारीत करावे, अशी विनंती केली आहे.

४. अर्जामधील कथने वादीने शपथेवर सांगितलेली आहेत. प्रस्तुतचा दावा हा तुटक वाटप होवुन पृथक कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. वादीने मागितलेली दुरुस्ती ही टंकलेखनाच्या चुकीमुळे झाल्याचे दिसुन येते. दुरुस्ती केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. वादी मागत असलेली दुरुस्ती ही भविष्यातील दावे प्रतिदावे टाळण्यासाठी व दाव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यक वाटते. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार

नाही. सबब अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादीने अर्जात मागणी केलेली दुरुस्ती मुदतीत करुन घ्यावी.

SWATI BHASKAR NAIKNAVARE GARAD
Digitally signed by SWATI BHASKAR NAIKNAVARE GARAD
Date: 2022.10.11 11:35:10 +0530

मिरज. **( स्वाती भा. नाईकनवरे–गरड )**

दि. १०/१०/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | S. K. Jadhav, Grade-3 |
| Court. | : | Jt. Civil Judge,Jr.Dn.,Miraj |
| Date. | : | 10.10.2022. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 10.10.2022. |
| Order uploaded on. | : | 11.10.2022. |